| | |
|---|---|
| विषय क्र. ०१.<br>दि.०५ ऑगस्ट, २०२२. | नेरुळ विभागातील नमुंमपा शाळांची वार्षिक देखभाल व दुरुस्ती करणे, आयुक्तांचे दिनांक ०५/०८/२०२२, चे पत्र जा. क्र. नमुंमपा/श.अ./२५००/२०२२. |
| ठराव क्रमांक<br>२६३९ | "उपरोक्त संदर्भात नेरुळ विभागातील नमुंमपा शाळांची वार्षिक देखभाल व दुरुस्ती करणे, प्रस्तावित केल्याप्रमाणे मे.रिलायंन्स कंन्स्ट्रक्शन या कंत्राटदारा बरोबर कार्यालयीन अंदाजपत्रकीय दराने म्हणजेच रक्कम रु.४१,९७,०२६/- + रु.७,५५,४६५/- (१८% GST सह) = रु.४९,५२,४९१/- (अक्षरी रक्कम रुपये एकोणपन्नास लक्ष बावन्न हजार चारशे एक्क्याण्णव मात्र) इतक्या खर्चाचे कंत्राट करण्यास प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या १९४९ च्या कलम ७३ (क) अन्वये मा.आयुक्त तथा मा. प्रशासक यांची संमती देण्यात यावी." |
| निर्णय : | ठराव करण्यात येतो की,<br>नेरुळ विभागातील नमुंमपा शाळांची वार्षिक देखभाल व दुरुस्ती करणे, सादर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले आहे.<br>त्यानुसार विषय क्रमांक ०१ ठराव क्रमांक २६३९ अन्वये, प्रस्तावित केल्याप्रमाणे मे.रिलायंन्स कंन्स्ट्रक्शन या कंत्राटदारा बरोबर कार्यालयीन अंदाजपत्रकीय दराने म्हणजेच रक्कम रु.४१,९७,०२६/- + रु.७,५५,४६५/- (१८% GST सह) = रु.४९,५२,४९१/- (अक्षरी रक्कम रुपये एकोणपन्नास लक्ष बावन्न हजार चारशे एक्क्याण्णव मात्र) इतक्या खर्चाचे कंत्राट करण्यास प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या १९४९ च्या कलम ७३ (क) अन्वये मा.आयुक्त तथा मा. प्रशासक यांची संमती देण्यात येत आहे. |

सही/-
(चित्रा बाविस्कर)
नगरसचिव
नवी मुंबई महानगरपालिका

सही/-
(अभिजीत बांगर)
आयुक्त तथा प्रशासक
नवी मुंबई महानगरपालिका

| | |
|---|---|
| विषय क्र. ०२. दि.०५ ऑगस्ट, २०२२. | **नवी मुंबई महानगरपालिकेच्या सार्वजनिक रुग्णालय वाशी येथील CT Scan व X-Ray Machine करिता आवश्यक Film ची खरेदी करणेकरिता प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत, आयुक्तांचे दिनांक ०४/०८/२०२२, चे पत्र जा. क्र. नमुंमपा/आरोग्य/८१७४/२०२२.** |
| ठराव क्रमांक २६४० | "उपरोक्त संदर्भात नवी मुंबई महानगरपालिकेच्या सार्वजनिक रुग्णालय वाशी येथील CT Scan व X-Ray Machine करिता आवश्यक Film ची खरेदी करणेकरिता प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत, प्रस्तावित केल्याप्रमाणे सदरचा खर्च सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षातील आरोग्य विभागाच्या रुग्णालयीन उपकरणे खरेदी या लेखाशिर्षामध्ये उपलब्ध तरतूद रु.२६०० लक्ष यामधून भागविण्यात येईल. किवा खर्च तरतुदीपेक्षा जास्त होत असल्यास पुनर्वियोजन करण्यात येईल किंवा उर्वरित खर्च पुढील वर्षाच्या अंदाजपत्रकीय तरतुदीमधून भागविता येईल.<br>सार्वजनिक रुग्णालय वाशी येथील Radiology विभागाकरिता आवश्यक ६०००० नग CT Scan Film व ६०,००० नग X-Ray खरेदी करणेस व अंदाजित खर्च रु.३८,३०,४००/- (अक्षरी रक्कम रुपये अडतीस लक्ष तीस हजार चारशे रुपये मात्र) यास मा. आयुक्त यांनी मान्यता दिलेली असून त्यासंबधीचे प्रतिवृत्त प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह मा.आयुक्त तथा मा. प्रशासक यांची मान्यता देण्यात यावी." |
| निर्णय : | ठराव करण्यात येतो की,<br>नवी मुंबई महानगरपालिकेच्या सार्वजनिक रुग्णालय वाशी येथील CT Scan व X-Ray Machine करिता आवश्यक Film ची खरेदी करणेकरिता प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत, सादर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले आहे.<br>त्यानुसार विषय क्रमांक ०२ ठराव क्रमांक २६४० अन्वये, प्रस्तावित केल्याप्रमाणे सदरचा खर्च सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षातील आरोग्य विभागाच्या रुग्णालयीन उपकरणे खरेदी या लेखाशिर्षामध्ये उपलब्ध तरतूद रु.२६०० लक्ष यामधून भागविण्यात येईल. किवा खर्च तरतुदीपेक्षा जास्त होत असल्यास पुनर्वियोजन करण्यात येईल किंवा उर्वरित खर्च पुढील वर्षाच्या अंदाजपत्रकीय तरतुदीमधून भागविता येईल.<br>सार्वजनिक रुग्णालय वाशी येथील Radiology विभागाकरिता आवश्यक ६०००० नग CT Scan Film व ६०,००० नग X-Ray खरेदी करणेस व अंदाजित खर्च रु.३८,३०,४००/- (अक्षरी रक्कम रुपये अडतीस लक्ष तीस हजार चारशे रुपये मात्र) यास मा. आयुक्त यांनी मान्यता दिलेली असून त्यासंबधीचे प्रतिवृत्त प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह मा.आयुक्त तथा मा. प्रशासक यांची मान्यता देण्यात येत आहे. |

सही/-
(चित्रा बाविस्कर)
नगरसचिव
नवी मुंबई महानगरपालिका

सही/-
(अभिजीत बांगर)
आयुक्त तथा प्रशासक
नवी मुंबई महानगरपालिका

**विषय क्र. ०३.
दि.०५ ऑगस्ट, २०२२.**

**भुखंड क्र. ०४, सेक्टर ०९, घणसोली येथे Special School- Welfare Center For Person's with Disabilities वापरासाठी बांधकाम परवानगीबाबत, आयुक्तांचे दिनांक ०५/०८/२०२२, चे पत्र जा. क्र. नमुंमपा/नरवि/ससंनर /२४५९/२०२२.**

**ठराव क्रमांक
२६४१**

"उपरोक्त संदर्भात भुखंड क्र. ०४, सेक्टर ०९, घणसोली येथे Special School-Welfare Center For Person's with Disabilities वापरासाठी बांधकाम परवानगीबाबत, प्रस्तावित केल्याप्रमाणे भूखंड क्र. ०४, सेक्टर ०९, घणसोली येथे Special School-Welfare Center for Person's with Disabilities वापरासाठी बांधकाम परवानगी प्राप्त करण्यासाठी भाडेपट्टेदार मे. शिवशंकर शिक्षण संस्था यांचे वास्तुविशारद मे. हितेश सेठी आर्किटेक्ट प्रा. लि. यांचे मार्फत दि.२७/०२/२०२०, दि.१२/११/२०२० व दि.०६/०७/२०२२ रोजी प्रस्ताव प्राप्त झाला आहे.

सदर प्रस्तावासोबत सादर केलेल्या भाडेपट्टेकरारनाम्याचे अवलोकन केले असता सदर भुखंड हा Special School-Welfare Center for Person's with Disabilities या वापराकरीता वितरीत केलेला आहे. प्रस्तावांतर्गत भुखंड हा नवी मुंबई नवनगर क्षेत्रासाठी मंजूर केलेल्या रचनाबध्द (Structural Plan) विकास योजनेमधील सिडकोने तयार केलेल्या नोडल नकाशानुसार रहिवास वापर विभागामध्ये (Residential Zone) मध्ये दर्शविलेला आहे. सिडको मार्फत सदरच्या नोडल नकाशांमध्ये वेळोवेळी बदल करण्यात येतो. त्यास अनुसरुन नवी मुंबई महानगरपालिकेने विकास योजना प्रसिध्द करण्याच्या अनुषंगाने सिडकोकडे अद्ययावत नोडल नकाशांची माहिती अपेक्षिलेली होती. त्याअनुषंगाने सिडकोकडून दि. १३/१२/२०२१ रोजी अद्यावत नोडल नकाशे प्राप्त झालेले आहे. सदर नोडल नकाशानुसार सदर भुखंड हा रहिवास विभागात दर्शविला आहे.

नवी मुंबई महानगरपालिकेची विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २६ (१) अन्वये प्रसिध्द करणेकरीता मा.महासभेने दि.३१/१२/२०१९ रोजीच्या ठराव क्र.१५१६ अन्वये काही बदल सुचवून प्रसिध्द करणेकरीता मान्यता दिलेली आहे. सदर प्रारुप विकास योजनेच्या नकाशामध्ये विषयांकित भुखंड हा विकास योजना तयार करतेवेळी आरक्षण क्रमांक ३२ मार्केट या वापरासाठी भागश: प्रस्तावित आहे.

नवी मुंबई महानगरपालिकेची विकास योजना अद्यापपर्यंत प्रसिध्द झालेली नाही. तथापि, मा. महासभेने दि.३१/१२/२०१९ रोजीच्या ठराव क्र.१५१६ अन्वये सुचविलेल्या बदलांसह अधिनियमातील तरतूदींनुसार प्रसिध्द करणेकरीता मान्यता दिलेली आहे. त्यामुळे सदर नकाशास वैधानिक स्वरुप प्राप्त झालेले आहे. सदर भुखंड क्र. ४ व ५ वर आरक्षण क्र. ३२ नुसार मार्केट प्रस्तावित आहे (भुखंड क्र..४ चे क्षेत्रफळ ४२५.८४ चौ.मी. व भूखंड क्र. ५ चे क्षेत्रफळ ३५१.६५७ चौ.मी. इतके असून एकत्रित ७७७.४९७ चौ.मी. क्षेत्र मार्केट आरक्षित आहे.) त्यापैकी भूखंड क्र. ४ चे क्षेत्रफळ ४२५.८४ चौ.मी. भूखंड हा मे. शिवशंकर शिक्षण संस्थेला Special School-Welfare Center for Person's with Disabilities या वापरासाठी सिडकोने वितरीत केलेला आहे. त्या भूखंडावर Public and Semi Public Land Use हा वापर प्रस्तावित आहे. सदर प्रस्तावावर विकास परवानगी देण्याची कार्यवाही करण्यापुर्वी प्रारुप विकास योजनेच्या प्रस्तावातील मा. महासभेने मंजूर केलेल्या ठरावाचा विचार करता सदर भुखंड क्र. ४ या भुखंडावर प्रस्तावित मार्केटचे आरक्षण रद्द करून त्याऐवजी "Public and Semi Public Land Use वापर विभाग" असा बदल करणे आवश्यक आहे. तसेच उक्त प्रारुप विकास योजना प्रसिध्द करतेवेळी सदर बदलाबाबतचा अंतर्भाव विकास योजनेमध्ये करण्यात यावा.

| Sr. No. | Plot Details | Name of Licensee | Area in sq.mt. | Use as per CIDCO Agreement | Proposed Zone (as per Draft Prior publication) | मा. महासभेच्या दि.३१/१२/२०१९ रोजीच्या मंजूर ठरावानुसार | Remark |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | Plot No.०४, Sector-No.०९, Ghansoli | M/s. ShivShankar Shikshan Sanstha | ४२५.८४ चौ.मी. | Special School-Welfare Center for Person's with Disabilities | Market (Part) | Nil | Partly Deleted from Market & including in Public and Semi Public Land Use |

उपरोक्त बदलास प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह मा.आयुक्त तथा मा.प्रशासक यांची मंजुरी देण्यात यावी."

**निर्णय :**

ठराव करण्यात येतो की,

भुखंड क्र. ०४, सेक्टर ०९, घणसोली येथे Special School- Welfare Center For Person's with Disabilities वापरासाठी बांधकाम परवानगीबाबत, सादर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले आहे.

त्यानुसार विषय क्रमांक ०३ ठराव क्रमांक २६४१ अन्वये, प्रस्तावित केल्याप्रमाणे भूखंड क्र. ०४, सेक्टर ०९, घणसोली येथे Special School-Welfare Center for Person's with Disabilities वापरासाठी बांधकाम परवानगी प्राप्त करण्यासाठी भाडेपट्टेदार मे. शिवशंकर शिक्षण संस्था यांचे वास्तुविशारद मे. हितेश सेठी आर्किटेक्ट प्रा. लि. यांचे मार्फत दि.२७/०२/२०२०, दि.१२/११/२०२० व दि.०६/०७/२०२२ रोजी प्रस्ताव प्राप्त झाला आहे.

सदर प्रस्तावासोबत सादर केलेल्या भाडेपट्टेकरारनाम्याचे अवलोकन केले असता सदर भुखंड हा Special School-Welfare Center for Person's with Disabilities या वापराकरीता वितरीत केलेला आहे. प्रस्तावांतर्गत भुखंड हा नवी मुंबई नवनगर क्षेत्रासाठी मंजूर केलेल्या रचनाबध्द (Structural Plan) विकास योजनेमधील सिडकोने तयार केलेल्या नोडल नकाशानुसार रहिवास वापर विभागामध्ये (Residential Zone) मध्ये दर्शविलेला आहे. सिडको मार्फत सदरच्या नोडल नकाशांमध्ये वेळोवेळी बदल करण्यात येतो. त्यास अनुसरुन नवी मुंबई महानगरपालिकेने विकास योजना प्रसिध्द करण्याच्या अनुषंगाने सिडकोकडे अद्ययावत नोडल नकाशांची माहिती अपेक्षिलेली होती. त्याअनुषंगाने सिडकोकडून दि. १३/१२/२०२१ रोजी अद्यावत नोडल नकाशे प्राप्त झालेले आहे. सदर नोडल नकाशानुसार सदर भुखंड हा रहिवास विभागात दर्शविला आहे.

नवी मुंबई महानगरपालिकेची विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २६ (१) अन्वये प्रसिध्द करणेकरीता मा.महासभेने दि.३१/१२/२०१९ रोजीच्या ठराव क्र.१५१६ अन्वये काही बदल सुचवून प्रसिध्द करणेकरीता मान्यता दिलेली आहे. सदर प्रारुप विकास योजनेच्या नकाशामध्ये विषयांकित भुखंड हा विकास योजना तयार करतेवेळी आरक्षण क्रमांक ३२ मार्केट या वापरासाठी भागश: प्रस्तावित आहे.

नवी मुंबई महानगरपालिकेची विकास योजना अद्यापपर्यंत प्रसिध्द झालेली नाही. तथापि, मा. महासभेने दि.३१/१२/२०१९ रोजीच्या ठराव क्र.१५१६ अन्वये सुचविलेल्या बदलांसह अधिनियमातील तरतूदींनुसार प्रसिध्द करणेकरीता मान्यता दिलेली आहे. त्यामुळे सदर नकाशास वैधानिक स्वरुप प्राप्त झालेले आहे. सदर भुखंड क्र. ४ व ५ वर आरक्षण क्र. ३२ नुसार मार्केट प्रस्तावित आहे (भुखंड क्र..४ चे क्षेत्रफळ ४२५.८४ चौ.मी. व भूखंड क्र. ५ चे क्षेत्रफळ ३५१.६५७ चौ.मी. इतके असून एकत्रित ७७७.४९७ चौ.मी. क्षेत्र मार्केट आरक्षित आहे.) त्यापैकी भूखंड क्र. ४ चे क्षेत्रफळ ४२५.८४ चौ.मी. भूखंड हा मे. शिवशंकर शिक्षण संस्थेला Special School-Welfare Center for Person's with Disabilities या वापरासाठी सिडकोने वितरीत केलेला आहे. त्या भूखंडावर Public and Semi Public Land Use हा वापर प्रस्तावित आहे. सदर प्रस्तावावर विकास परवानगी देण्याची कार्यवाही करण्यापुर्वी प्रारुप विकास योजनेच्या प्रस्तावातील मा. महासभेने मंजूर केलेल्या ठरावाचा विचार करता सदर भुखंड क्र. ४ या भुखंडावर प्रस्तावित मार्केटचे आरक्षण रद्द करून त्याऐवजी "Public and Semi Public Land Use वापर विभाग" असा बदल करणे आवश्यक आहे. तसेच उक्त प्रारुप विकास योजना प्रसिध्द करतेवेळी सदर बदलावाबतचा अंतर्भाव विकास योजनेमध्ये करण्यात यावा.

| Sr. No. | Plot Details | Name of Licensee | Area in sq.mt. | Use as per CIDCO Agreement | Proposed Zone (as per Draft Prior publication) | मा. महासभेच्या दि.३१/१२/२०१९ रोजीच्या मंजूर ठरावानुसार | Remark |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | Plot No.०४, Sector-No.०९, Ghansoli | M/s. ShivShankar Shikshan Sanstha | ४२५.८४ चौ.मी. | Special School-Welfare Center for Person's with Disabilities | Market (Part) | Nil | Partly Deleted from Market & including in Public and Semi Public Land Use |

उपरोक्त बदलास प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह मा.आयुक्त तथा मा.प्रशासक यांची मंजुरी देण्यात येत आहे.

सही/-
(चित्रा बाविस्कर)
नगरसचिव
नवी मुंबई महानगरपालिका

सही/-
(अभिजीत बांगर)
आयुक्त तथा प्रशासक
नवी मुंबई महानगरपालिका

विषय क्र. ०४.
दि.०५ ऑगस्ट, २०२२.

**ठराव क्रमांक २६४२**

"उपरोक्त संदर्भात नवी मुंबई महानगरपालिका आरोग्य विभागात करार पध्दतीने (कंत्राटी) निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात विशेषज्ञ वैदयकिय सल्लागार अधिकारी (दंतशल्यचिकित्सक तज्ञ) यांच्या नेमणूकीबाबत, प्रस्तावित केल्याप्रमाणे नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रामध्ये आरोग्य विभागाअंतर्गत ३ सार्वजनिक रुग्णालये, ३ माता बाल रुग्णालये व २३ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र यांचेमार्फत आरोग्य सेवा नागरीकांना उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.

नवी मुंबई महानगरपालिका अंतर्गत सार्वजनिक रुग्णालय, वाशी या रुग्णालयात नमुंमपा कार्यक्षेत्रातासहित पनवेल, उरण, मानखुर्द असे नमुंमपा कार्यक्षेत्राबाहेरील, सर्व प्रकारचे रुग्ण मोठया प्रमाणावर उपचारार्थ येत असतात. त्याचप्रमाणे सार्वजनिक रुग्णालय, नेरुळ व ऐरोली पुर्ण कार्यक्षमतेने १० आय.सी.यु. बेड चे कक्ष कार्यान्वित करण्यात आलेले आहे तसेच माता बाल रुग्णालय, तुर्भे हे सुध्दा सुरु करण्यात आलेले असुन रुग्णांना सेवा देणे सुरु झाले आहे.

वरील रुग्णालयामधून वैदयकशास्त्र, प्रसुती व स्त्रीरोग, नवजात शिशु, बालरोग, त्वचारोग, क्षयरोग मानसोपचार, भौतिकोपचार, नेत्रचिकित्सा, अस्थिव्यंग, कान नाक घसा चिकित्सा, अतिदक्षता विभाग, हदयरोग विभाग, शरीर विकृतीशास्त्र विभाग, क्ष-किरण विभाग कार्यान्वीत आहेत. उपलब्ध सुविधा या नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील व कार्यक्षेत्राबाहेरील रुग्ण सदर सेवेचा लाभ घेत आहेत.

वरील प्रमाणे रुग्णालयात रुग्णांना सेवा देण्यासाठी उपलब्ध असलेल्या विभागाकरिता तज्ञ वैदयकिय अधिकारी यांची कमतरता भासत असुन पुर्ण क्षमतेने रुग्णालय सुरु करण्यासाठी तज्ञ वैदयकिय अधिका-यांची नितांत आवश्यकता आहे.

अधिनियमातील तरतूद :-

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम

१) ५३ (१) अन्वये महानगरपालिकेच्या ज्या अधिका-यांचे किमान मासिक भत्ते वगळून चारशे रुपये किंवा त्याहून अधिक आहे — मग असे अधिकारी तात्पुरते असोत किंवा कायम असोत- त्यांची नेमणुक करण्याचा अधिकार महानगरपालिकेकडे निहित असेल ;

परंतु, आयुक्ताला भत्ते वगळून चारशे रुपये किंवा त्याहुन अधिक मासिक वेतन असलेल्या कर्जाविषयक कामांसाठी करावाच्या कोणत्याही अस्थायी नेमणुका सहा महिन्यांहून अधिक नसलेल्या कालावधीसाठी स्थायी समितीच्या पुर्वमंजुरीने या अटीवर करता येतील की आयुक्ताने अशी प्रत्येक नेमणुक करताना त्याविषयी महनगरपालिकेस पुर्वमंजुरीवाचुन अशा कोणत्याही नेमणुकीचे नवीकरण करता येणार नाही.

तज्ञ वैदयकिय अधिकारी यांना रुग्णालयाच्या आवश्यकतेनुसार निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सहा महिन्याच्या कालावधी करीता नियुक्ती आदेश देण्यात येत असतात.

रुग्णालयातील दंतशल्य्चिकित्सक पदाचे एकूण ०९ पदे मंजूर असून कायम २ पदे भरलेली व करारवरील ५ दंतशल्य्चिकित्सक कार्यरत असून करारवरील पदे वगळता रिक्त् पदे ०७ आहेत.

डॉ. साई नंदकुमार चव्हाण, यांनी दंतशल्य्चिकित्सक या पदावर नियुक्ती मिळणेबाबत अर्ज सादर केला आहे.

| अ.क्र | तज्ञ वैदयकिय अधिकारी नाव व पदनाम | रुग्णालयाचे नाव | मासिक ठोकमानधन रुपये/ वेतनश्रेणी |
|---|---|---|---|
| १ | डॉ. साई नंदकुमार चव्हाण | सार्वजनिक रुग्णालय, वाशी | १५६००-३९१०० ग्रेडवेतन ५४००/- |

नवी मुंबई महानगरपालिकेची विद्यमान मुदत दि.०७/०५/२०२० रोजी संपुष्टात येऊन महानगरपालिकेच्या प्रशासक पदाचा कार्यभार मा. आयुक्त यांनी स्विकारला आहे.

तरी उपरोक्त प्रमाणे प्रस्तावित केलेल्या एकूण — ०१ तज्ञ वैदयकिय अधिकारी (दंतशल्य्चिकित्सक) यांना १५०००-३९१०० ग्रेड वेतन ५४००/- वर, तात्पुरत्या स्वरुपात करार पध्दतीवर प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, मधील कलम ५३ (१) अन्वये नव्याने सार्वजनिक रुग्णालय, वाशी येथे नव्याने नियुक्ती देण्याकरीता मा.आयुक्त तथा मा. प्रशासक, यांची मान्यता देण्यात यावी."

**निर्णय :**

ठराव करण्यात येतो की,

नवी मुंबई महानगरपालिका आरोग्य विभागात करार पध्दतीने (कंत्राटी) निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात विशेषज्ञ वैदयकिय सल्लागार अधिकारी (दंतशल्यचिकित्सक तज्ञ) यांच्या नेमणूकीबाबत, सादर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले आहे.

त्यानुसार विषय क्रमांक ०४ ठराव क्रमांक २६४२ अन्वये, प्रस्तावित केल्याप्रमाणे नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रामध्ये आरोग्य विभागाअंतर्गत ३ सार्वजनिक रुग्णालये, ३ माता बाल

रुग्णालये व २३ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र यांचेमार्फत आरोग्य सेवा नागरीकांना उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.

नवी मुंबई महानगरपालिका अंतर्गत सार्वजनिक रुग्णालय, वाशी या रुग्णालयात नमुंमपा कार्यक्षेत्रातासहित पनवेल, उरण, मानखुर्द असे नमुंमपा कार्यक्षेत्राबाहेरील, सर्व प्रकारचे रुग्ण मोठया प्रमाणावर उपचारार्थ येत असतात. त्याचप्रमाणे सार्वजनिक रुग्णालय, नेरुळ व ऐरोली पुर्ण कार्यक्षमतेने १० आय.सी.यु. बेड चे कक्ष कार्यान्वित करण्यात आलेले आहे तसेच माता बाल रुग्णालय, तुर्भे हे सुध्दा सुरु करण्यात आलेले असुन रुग्णांना सेवा देणे सुरु झाले आहे.

वरील रुग्णालयामधून वैदयकशास्त्र, प्रसुती व स्त्रीरोग, नवजात शिशु, बालरोग, त्वचारोग, क्षयरोग मानसोपचार, भौतिकोपचार, नेत्रचिकित्सा, अस्थिव्यंग, कान नाक घसा चिकित्सा, अतिदक्षता विभाग, हृदयरोग विभाग, शरीर विकृतीशास्त्र विभाग, क्ष-किरण विभाग कार्यान्वीत आहेत. उपलब्ध सुविधा या नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील व कार्यक्षेत्राबाहेरील रुग्ण सदर सेवेचा लाभ घेत आहेत.

वरील प्रमाणे रुग्णालयात रुग्णांना सेवा देण्यासाठी उपलब्ध असलेल्या विभागाकरिता तज्ञ वैदयकिय अधिकारी यांची कमतरता भासत असुन पुर्ण क्षमतेने रुग्णालय सुरु करण्यासाठी तज्ञ वैदयकिय अधिका-यांची नितांत आवश्यकता आहे.

अधिनियमातील तरतूद :-

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम

१) ५३ (१) अन्वये महानगरपालिकेच्या ज्या अधिका-यांचे किमान मासिक भत्ते वगळून चारशे रुपये किंवा त्याहून अधिक आहे — मग असे अधिकारी तात्पुरते असोत किंवा कायम असोत- त्यांची नेमणुक करण्याचा अधिकार महानगरपालिकेकडे निहित असेल ;

परंतु, आयुक्ताला भत्ते वगळून चारशे रुपये किंवा त्याहुन अधिक मासिक वेतन असलेल्या कर्जाविषयक कामांसाठी करावाच्या कोणत्याही अस्थायी नेमणुका सहा महिन्यांहून अधिक नसलेल्या कालावधीसाठी स्थायी समितीच्या पुर्वमंजुरीने या अटीवर करता येतील की आयुक्ताने अशी प्रत्येक नेमणुक करताना त्याविषयी महनगरपालिकेस पुर्वमंजुरीवाचुन अशा कोणत्याही नेमणुकीचे नवीकरण करता येणार नाही.

तज्ञ वैदयकिय अधिकारी यांना रुग्णालयाच्या आवश्यकतेनुसार निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सहा महिन्याच्या कालावधी करीता नियुक्ती आदेश देण्यात येत असतात.

रुग्णालयातील दंतशल्यचिकित्सक पदाचे एकुण ०९ पदे मंजूर असून कायम २ पदे भरलेली व करारवरील ५ दंतशल्यचिकित्सक कार्यरत असून करारवरील पदे वगळता रिक्त् पदे ०७ आहेत.

डॉ. साई नंदकुमार चव्हाण, यांनी दंतशल्यचिकित्सक या पदावर नियुक्ती मिळणेबाबत अर्ज सादर केला आहे.

| अ.क्र | तज्ञ वैदयकिय अधिकारी नाव व पदनाम | रुग्णालयाचे नाव | मासिक ठोकमानधन रुपये/ वेतनश्रेणी |
|---|---|---|---|
| १ | डॉ. साई नंदकुमार चव्हाण | सार्वजनिक रुग्णालय, वाशी | १५६००-३९१०० ग्रेडवेतन ५४००/- |

नवी मुंबई महानगरपालिकेची विद्यमान मुदत दि.०७/०५/२०२० रोजी संपुष्टात येऊन महानगरपालिकेच्या प्रशासक पदाचा कार्यभार मा. आयुक्त यांनी स्विकारला आहे.

तरी उपरोक्त प्रमाणे प्रस्तावित केलेल्या एकूण — ०१ तज्ञ वैदयकिय अधिकारी (दंतशल्यचिकित्सक) यांना १५०००-३९१०० ग्रेड वेतन ५४००/- वर, तात्पुरत्या स्वरुपात करार पध्दतीवर प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, मधील कलम ५३ (१) अन्वये नव्याने सार्वजनिक रुग्णालय, वाशी येथे नव्याने नियुक्ती देण्याकरीता मा.आयुक्त तथा मा. प्रशासक, यांची मान्यता देण्यात येत आहे.

सही/-
(चित्रा बाविस्कर)
नगरसचिव
नवी मुंबई महानगरपालिका

सही/-
(अभिजीत बांगर)
आयुक्त तथा प्रशासक
नवी मुंबई महानगरपालिका